# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 28.09.2026** **वार : सोमवार**

---

## ठळक बातम्या

1. भारतीय लष्करानं पाकिस्तानच्या दहशतवादी तळांवर केलेल्या सर्जिकल स्ट्राईकची आज दशकपूर्ती.
2. दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेचं भारताचं धोरण सर्जिकल स्ट्राईकमुळे अधोरेखित झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
3. बँक कर्मचाऱ्यांचा 3 दिवसांचा देशव्यापी संप स्थगित.
4. आशियाई क्रिडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंची चमकदार कामगिरी; महाराष्ट्राच्या सर्वेश कुशारेला उंच उडीमध्ये रौप्यपदक.
5. वेस्ट इंडीजविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताचा दणदणीत विजय; विराट कोहलीच्या एकदिवसीय क्रिकेटमधल्या 15 हजार धावा पूर्ण.

## सविस्तर बातम्या

**सर्जिकल स्ट्राइक्स**

भारतीय लष्कराने पाकिस्तानच्या हद्दीत जाऊन त्यांच्या दहशतवादी तळांवर केलेल्या हल्ल्यांना म्हणजे सर्जिकल स्ट्राइकला आज 10 वर्ष पूर्ण होत आहेत. उरी इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याला निर्णायक प्रत्युत्तर देण्यासाठी 2016 मध्ये 28-29 सप्टेंबर रोजी भारतीय लष्करानं पाकव्याप्त काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेपलीकडे जाऊन त्यांचे दहशतवादी तळ उद्धवस्त केले होते. मन की बातच्या कालच्या संवादातही पंतप्रधानांनी भारताच्या या कारवाईचं स्मरण केलं. भारताची दहशतवादाविरोधातली निर्णायक आणि ठाम भूमिका यातून दिसून आली; या दृष्टीने हा हल्ला ऐतिहासिक टप्पा असल्याचे पंतप्रधानांनी सांगितलं. भारतीय लष्करानं नियंत्रण रेषा ओलांडून केलेल्या हल्ल्याबाबत जगभरात आश्चर्याची प्रतिक्रिया उमटल्याचं त्यांनी नमूद केलं. त्याचबरोबर गेल्या 10 वर्षात दहशतवादविरोधी दृष्टिकोन विकसित होत गेला आहे आणि दहशतवादाविरोधातलं भारताचं शून्य सहनशीलतेचं धोरण अधिक ठळकपणे पुढे येत असल्याचंही पंतप्रधानांनी नमूद केलं आहे.

**राजनाथ सिंह**

भारताला कोणत्याही देशाच्या भूभागावर कब्जा करायचा नाही, परंतु धोका निर्माण झाल्यास आपल्या सुरक्षेचं आणि सामरिक स्वायत्ततेचं रक्षण करण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यासाठी भारत सक्षम आहे असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. ते काल नवी दिल्लीत एका संरक्षण परिषदेच्या कार्यक्रमात बोलत होते. एखादा शेजारी देश जोपर्यंत दहशतवादाला पाठिंबा देत राहील, तोपर्यंत भारताला त्याविरुद्ध सर्व आवश्यक उपाययोजना करण्याचा अधिकार आहे असंही सिंह यांनी स्पष्ट केलं.

**शिवराज सिंह**

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते आज दिल्लीत कृषीविषयक दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन होणार आहे. चालू वर्षातील रबी हंगामाच्या तयारीसाठी ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. आगामी रबी हंगामासाठीच्या प्राधान्यक्रमांवर आणि तयारीची चर्चा यामध्ये होईल. या परिषदेत केंद्र आणि राज्य यांच्यातील कृषी आधारित कृषी उत्पादन, उत्पादकता, शाश्वतता आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसंदर्भात समन्वित आणि परिणाम केंद्रित धोरण विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करण्यावर भर दिला जाईल असं कृषी मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलं आहे.

**पदवीप्रदान सोहळा**

आरोग्य सेवेतील वेगवान प्रगतीच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञान डॉक्टरांच्या मानवी स्पर्शाची जागा घेऊ शकत नाही, असं मत उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केलं. ते काल केरळम मधल्या तिरुअनंतपुरम इथल्या एसयूटी ॲकॅडमी ऑफ मेडिकल सायन्सेसच्या पदवीप्रदान सोहळ्यात बोलत होते.

**अमित शाह**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी काल साबरमती मध्ये पंधराशे कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या अनेक मोठ्या रेल्वे विकास प्रकल्पांचे उद्धाटन, पायाभरणी आणि शुभारंभ केला. तसंच गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासमवेत त्यांनी साबरमती स्थानकावरून एलएनजीवर चालणाऱ्या देशातल्या पहिल्या रेल्वेला हिरवा झेंडाही दाखवला. रेल्वेमधला डिझेलचा वार्षिक वापर 293 कोटी लिटरवरून 108 कोटी लिटर इतक्या मोठ्या प्रमाणात कमी झाला असून, तो पूर्णपणे बंद करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं शहा यावेळी म्हणाले.

**दुष्काळ-सी. आर. पाटील**

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे पुनर्भरणाची अंमबजावणी, प्रलंबित सिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास केंद्र आणि राज्य सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी दिली आहे. ते काल धुळे जिल्ह्यातील एका पुरस्कार सोहळ्यात बोलत होते. उकाई धरणातील पाणी महाराष्ट्राला उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले.

**बँक संप मागे**

बँक कर्मचाऱ्यांनी आजपासून पुकारलेला तीन दिवसांचा देशव्यापी संप काल रात्री मागे घेण्यात आला आहे. इंडियन बँक असोसिएशन आणि 'ऑल इंडिया बँक एम्प्लॉइज असोसिएशन'या बँक कर्मचारी संघटनेदरम्यान चर्चेनंतर संप पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. 5 दिवसांचा आठवडा ही बँक कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. या आणि इतर मागण्यांसदर्भात सर्व कर्मचारी संघटनांची शिखर संघटना युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन आणि इंडियन बँक्स असोसिएशन यांची उच्च स्तरीय समितीची स्थापना करण्यात येणार असल्याचं ऑल इंडिया बँक एम्प्लॉइज असोसिएशननं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात नमूद केलं आहे.

**UPI-सर्वोच्च न्यायायल**

दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या ग्राहक ते व्यापारी यांच्यातील युपीआय व्यवहारांवर मर्चंट डिस्काउंट रेट लागू करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी होणार आहे. सहा वर्ष पूर्णपणे मोफत युपीआय सेवेनंतर येत्या 15 ऑक्टोबरपासून दोन हजारापुढील व्यवहारांवर 4 दशांश टक्के शुल्क आकारण्यात येणार आहेत. त्यातून व्यक्ती ते व्यक्ती व्यवहार आणि दोन हजारापेक्षा लहान देयके वगळ्यात आली आहेत.

**सीतारामन-कतार दौरा**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन सध्या कतारच्या 2 दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान, त्या आज दोहा एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक-एआयआयबीच्या गव्हर्नर्स मंडळाच्या 11 व्या वार्षिक बैठकीला उपस्थित राहतील, तसंच एआयआयबीचे अध्यक्ष आणि जॉर्डन, स्वित्झर्लंड, अल्जेरिया, सौदी अरेबिया आणि नेपाळ मधल्या अर्थमंत्र्यांसमवेत इतर महत्त्वाच्या द्विपक्षीय बैठकीत सहभागी होतील.

**जयशंकर-कॅनडा**

भारत आणि कॅनडा यांच्यातील द्विपक्षीय संबंध अधिक उच्च पातळीवर नेण्याची तयारी असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री अनिता आनंद यांची भेट घेतली. त्यानंतर समाज माध्यमांवरील संदेशात ही भेट फलदायी ठरल्याचं आणि उभय देश संबंध दृढ करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं नमूद केलं आहे.

**विकसित भारत दुबई**

दुबईमधल्या भारतीय वाणिज्य दूतावासानं सेवा पंधरवड्या अंतर्गत विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. या उपक्रमांतर्गत दिल्लीत आयोजित विकसित भारत रन या उपक्रमात अनेक भारतीय नागरिकांनी मोठ्या संख्येनं सहभाग नोंदवला. वाणिज्य दूत डॉ. ई. विष्णू

वर्धन रेड्डी यांनी या रनला हिरवा झेंडा दाखवला. तसंच यावेळी दूतावासाकडून आयोजित करण्यात आलेल्या श्रम शिबिरात भारतीय कामगारांसाठी आर्थिक आणि वैद्यकीय साक्षरतेबाबत जनजागृती पर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**<u>विशेष पुनरीक्षण</u>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं दिल्लीतील विशेष पुनरीक्षण कार्यक्रमासाठी सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध केलं आहे. यामध्ये दावे आणि हरकती दाखल करण्याची अंतिम मुदत वाढवून 30 ऑक्टोबर करण्यात आली आहे तर दावे, हरकती निवारण 30 नोव्हेंबरपर्यंत होणार आहे. अंतिम मतदार यादी 4 डिसेंबर रोजी प्रसिद्ध होणार असल्याचं दिल्लीच्या निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. अर्ज क्रमांक सहा द्वारे नवीन मतदार नोंदणीची शिबिरे काल यशस्वीपणे आयोजित करण्यात आल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<u>बुद्धिबळ ऑलिम्पियाड</u>**

उझबेकिस्तानमधील समरकंद इथं झालेल्या 46 वा बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघानं खुल्या गटात रौप्य आणि महिलांच्या गटात कास्य पदक जिंकत सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. या विजयामुळे नोना गॅप्रिदाश्विली करंडक भारताकडे राखण्यात यश आलं आहे. पुरुषांच्या संघाने हंगेरीसमवेतचा सामना आणि महिला संघाने जॉर्जियासमवेत सामना बरोबरीत राखला. भारतानं तिसऱ्यांदा हा करंडक जिंकला आहे.

**<u>आशिया-क्रीडा स्पर्धा</u>**

जपानमधील नागोया इथं सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली आहे. काल झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या सर्वेश कुशारेने उंच उडीमध्ये रौप्यपदक आणि महिलांच्या 200 मीटर धावण्याच्या शर्यतीत हरिता भद्राने कास्यपदकाची कमाई केली आहे.

पुरुष क्रिकेटमध्ये, आशियाई क्रीडा स्पर्धेतील दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात आज निशिन इथं भारत आणि अफगाणिस्तान आमनेसामने असतील.

या स्पर्धेत आत्तापर्यंत भारताला 4 सुवर्ण, 16 रौप्य आणि 17 कास्य पदकांसह 37 पदकं मिळाली आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

तिरूअनंतपुरम इथं काल झालेल्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने 50 चेंडू आणि 8 गडी राखून दणदणीत विजय मिळवला. वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी करत 295 धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने 300 धावा करत हे लक्ष्य सहज गाठले. भारताकडून विराट कोहलीने 88 चेंडूत नाबाद 139 धावांची शानदार खेळी केली. कोहलीने या खेळीसह एकदिवसीय क्रिकेट मधील 15 हजार धावा पूर्ण केल्या. भारताकडून गोलंदाजीत कुलदीप यादवने प्रभावी कामगिरी करत 4 गडी बाद केले. कुलदीप यादव याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आलं. मालिकेतील दुसरा सामना येत्या 30 सप्टेंबर रोजी गुवाहाटी खेळला जाणार आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.